**मा. पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,**
**वजिराबाद चौक, नांदेड- 431601**
**ईमेल :-** sp.nanded@mahapolice.gov.in
pronanded@gmail.com

**PRESS NOTE** दिनांक -12.09.2025

# " अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा-या टिप्परवर कार्यवाही करुन एकुण 40,25,000/- रुपयाचा मुद्देमाल केला जप्त..

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगीरी

| ठाणे | गु.र.नं. व कलम | तक्रारदाराचे नाव/रिपोर्ट देणाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| नांदेड ग्रामीण् | गु.र.क्र.882/2025 कलम 303(2), बीएनस सह कलम 47,48 म.ज.म.संहिता 1966 | पोकॉ/1425 गोविंद सुर्यकांत राठोड ने-खंडणी विरोधी पथक,नांदेड |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **गुन्हा दाखल तारीख व वेळ** | **गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण** |
| गोपनीय | दिनांक-12/09/2025<br>10:00 वा. | दिनांक-12/09/2025 06:40 वा.<br>पो.स्टे.नांदेड ग्रामीण हददीत |

**गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार**

मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड
मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड
मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, भोकर
**यांचे मार्गदर्शनाखाली**
श्री. उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड
श्री. व्हि.एच.घोगरे, सहायक पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड
पोलीस अंमलदार, साहेबराव कदम, विठठल वैद्य,संतोष पावडे,गोविंद राठोड नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड

**आरोपीचे नाव व पत्ता**

दत्ता दिनेश भारती वय-२२ वर्ष व्यवसाय-चालक,रा.वाहेगाव,बेटसांगवी ता.जि.नांदेड.

**गुन्हयाची हकीकत**

नांदेड जिल्हयाध्ये वाळु माफियाकडुन अवैध मार्गाने वाळुची चोरटी वाहतुक करुन शासनाचा लाखो रुपयाचा महसुल बुडवीला जात असल्याने **मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** यांनी पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड यांना अवैध रेती वाहतुक करणा-या इसमांवर कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने दिनांक 11/09/2025 रोजी नोंद क्र.26 वेळ 23:00 वा सपोनि घोगरे स्थागुशा नांदेड (खंडणी विरोधी पथक) सोबत पोकॉ/संतोष पावडे,पोकॉ/सोबराव कदम,पोकॉ/ विठ्ठल वैद्य नेमणुक खंडणी विरोधी पथक नांदेड असे शासकिय वाहन क्र.MH26 CP 1608 पोलीस निरीक्षक स्था.गु.शा नांदेड यांचे आदेशाने रात्रगस्त दरम्याण अवैध धंदयावर कार्यवाही कामी रवाना झाले.

दिनांक 12/9/2025 रोजी 05:00 वा रात्रगस्त पेट्रोलींग करत लातुर फाटा येथे आले असता आम्हास गुप्त बातमीदाराकडुन माहिती प्राप्त झाली की,एक रेतीने भरलेला हायवा टिप्पर भनगी,मार्कंड मार्गे येत आहे.अशी खात्रीशीर माहिती मीळाल्याने सपोनि घोगरे यांनी पोकॉ/वैद्य यांना दोन पंचांना बोलावुन घेण्यास कळवले वरुन पोकॉ/567वैद्य यांनी दोन पंचांना बोलावुन घेतले व त्यांना रेती कार्यवाहीची माहिती दिली असता पंचानी पंच होण्यास होकार दिल्याने पंचांना सोबत घेवुन वाडीपाटी ब्रिजचे विष्णुपुरीकडे जाणारे सर्विस रोडला थांबले असता 06:40 वाजता एक टाटा कंपनीचा निळया व पांढ-या रंगाचा हायवा टिप्पर MH 40 CM 4719 क्रंमाकाचा येताना दिसला.त्याचे डाल्यातुन रस्त्यावर पाणी पाझरुन पडत होते.त्यास थांबवुन पंचासमक्ष हायवा चालकास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव दत्ता दिनेश भारती वय-22 वर्ष व्यवसाय-चालक,रा.वाहेगाव,बेटसांगवी ता.जि.नांदेड. असे सांगीतले.पंचासमक्ष हायवा/टिप्परची पाहणी केली असता टाटा कंपनीचा निळया व पांढ-या रंगाचा हायवा टिप्पर MH 40 CM 4719 क्रंमाकाचा किमंत 40,00000/- व त्या मध्ये 05 ब्रास रेती किमंत 25,000/- रु असा एकुण 40,25,000/- रुचा मुददेमाल मिळुन आला. मुददेमाल जप्त करुन आरोपी व मुद्देमाल पोस्टे नांदेड ग्रामीण येथे नेवून त्याचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

**मा.श्री अबिनाश कुमार पोलीस अधिक्षक,नांदेड** यांनी उकृष्ट कामगिरी केल्याने सदर पथकाचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड**